Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

UGC Approved Monthly Journal

VOL-IV | ISSUE-XI | Nov. | 2017

**Address**
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

**Email**
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

**Website**
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे आरक्षणाचे धोरण व कार्य

प्रा. दयानंद इनामदार
राज्यशास्त्र विभाग
श्रीपतराव चौगुले आर्टस ॲण्ड
सायन्स कॉलेज माळवाडी कोतोली
Email-dayanandinamdar@yahoo.in

विसाव्या शतकातील भारतीय नेत्यांच्या मालिकेत आणि आधुनिक महाराष्ट्राच्या शिल्पकारामध्ये कोल्हापूरचे राजर्षी छत्रपती महाराजांची गणना केली जाते. राजर्षि शाहू छत्रपतींची राजकीय कारकिर्द 2 एप्रिल 1894 ते 6 मे 1922 म्हणजेच केवळ 28 वर्षाची होती, पण या 28 वर्षाच्या दैदिप्यमान कारकिर्दीत त्यांनी महाराष्ट्रात सामाजिक क्रांती घडवून आणली. त्यांनी केलेल्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व इतर क्षेत्रात केलेले कार्य विशेषकरून सामाजिक व आर्थिकदृष्टया मागासलेल्या समाजाच्या उत्थानासाठी केलेले कार्य हे अनन्यसाधारण होते. त्यांनी केलेल्या सामाजिक क्रांतीमुळेच जनसामान्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडून आला. आपल्या राजसत्तेचा वापर सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी व्यथित केला म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाहू महाराजांच्या कार्याचा उल्लेख करताना म्हणतात, सामाजिक लोकशाहीचे आधार स्तंभ, हा त्यांचा कार्याचा ख या अर्थाने गुणगौरव आहे.

आधुनिक काळात अनेक राजे, सुधारक होऊन गेले, मात्र बहुजनांच्या न्याय हक्काचा प्रथम विचार करून सर्व प्रथम आरक्षण देऊन बहुजनांना सत्तेच्या प्रवाहात आणणारा पहिला राजा म्हणून शाहू महाराजांना आरक्षण धोरणाचे जनक म्हटले जाते.

## शाहू महाराजांचे आरक्षणाचे धोरण व कार्य :

राजर्षि छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक उन्नतीसाठी क्रांतीकारी धोरणांचा अवलंब केला. महात्मा फुल्यांनी आपल्या शेतक याचा असुड या ग्रंथात राखीव जागांची भूमीका मांडली आहे. 1882 साली शिक्षणाकरिता नेमलेल्या हंटर कमिशन समोर साक्ष देताना महात्मा फुलेंनी ब्राम्हणेतर जातीतील उमेदवारांना नोकरीत स्थान देण्याची प्रथम मागणी केली. तसेच दलित व मागास विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात यावी, अशीही मागणी केली. अशा प्रकारे महात्मा फुले यांनी भारतात सर्व प्रथम दलित व मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची संकल्पना मांडली होती.

महात्मा फुले यांनी केलेल्या आरक्षणाच्या मागणीची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणारे महापुरूष म्हणजे राजर्षी शाहू महाराज होय. महात्मा फुलेंच्या विचाराचे प्रतिबिंब शाहू महाराजांच्या कार्यात दिसून येते. शाहू छत्रपतींनी कोल्हापूरच्या राज्यकारभाराची सुत्रे स्विकारल्यानंतर आपण कोणते ध्येय स्विकारावयाचे हे निश्चित केलेले होते. इंग्रजाशी सहकार्य करून आपणास प्राप्त झालेल्या राजकीय सत्तेचा आणि अधिकाराचा वापर करून बहुजन समाजाच्या विकास करण्याचा मानस त्यांचा होता. या अनुषंगाने सामाजिक न्याय प्रस्तापित करण्याच्या दृष्टीने पहिले भरभक्कम पाऊल म्हणून 26 जून 1902 रोजी आरक्षणाचा क्रांतीकारी जाहीरनामा प्रसिध्द केला.

## 1902 चा क्रांतीकारी जाहीरनामा :

शाहू महाराजांना इ.स. 1901 सालच्या शिरगणतीमध्ये सरकारी नोक यामध्ये एकही ब्राम्हणेत्तर व्यक्ति नसल्याचे दिसुन आले. यामुळे ब्राम्हणोत्तरांना राज्यकारभारात आणण्यासाठी त्यांनी आरक्षणासंबंधी लंडनला एक ठराव पाठविला, तो 26 जून 1902 रोजी कोल्हापूर संस्थानाच्या गॅझेटमध्ये प्रसिध्द झाला. हा ठराव असा होता की, हुकूम पोहचलेल्या तारखेपासून नोक यात

शेकडा पन्नास टक्के जागा मागासलेल्या वर्गातून भराव्यात आणि ज्या ज्या ऑफिसमध्ये मागासवर्गातील अमंलदाराचे प्रमाण सद्या पन्नास टक्क्यापेक्षा कमी असेल तेथे पुढील नेमणूक मागासवर्गातील व्यक्तिंची करावी .याच जाहीरनाम्यात दर तीन महिन्यांनी प्रत्येक खात्याच्या प्रमुखाने पत्रक सरकारला पाठवावे.त्याच प्रमाणे या जाहिरनाम्यात मागासलेल्या वर्गाच्या अर्थ ब्राम्हण, प्रभू, शेणवी, पारशी व इतर पुढे गेलेले वर्ग सोडून असा समजावा असे बजावले होते.या जाहीरानाम्याचे वर्णन त्यांचे चरित्रकार धनंजय कीर करताना म्हणतात. नविन युगाच्या आगमनाची घोषणा करणारा अग्रदूत होय .

शाहू महाराज इंग्लडमध्ये असतानाच त्यांनी हा मागसलेल्या समाजासाठी संस्थानाच्या नोकरीत राखीव जागा ठेवणा या निर्णयाचे इंग्लडच्या परतीच्या प्रवासात अनेक ठिकाणी त्यांचे स्वागत झाले.दीन दुबळयांना स्वाभिमानाने जगण्याची संधी उपलब्ध करून दिली होती, त्या विषयी जाहीर कृतज्ञता व्यक्त करण्याचा प्रथम मान हातकणंगले नगरपालिकेने मिळवला त्यांनी या क्रांतीकारक जाहीरनाम्याबद्दल खास सभा भरवून शाहू छत्रपतींचे अभिनंदन केले. मात्र तीन टक्के असणा या ब्राम्हण उच्चभु समाजाला पन्नास टक्के आरक्षण असताना सुध्दा या जाहीरनाम्याचा अपवित्र गोष्ट म्हणून निषेध होऊ लागला. प्रा.विजापूरकरांच्या समर्थ पत्रकाने अशी टीका केली, जाहीरनाम्याने कायद्याने पाविञ्य भ्रष्ट केले आहे.शास्त्रात दिलेला अधिकार धुडकावून लावण्यात आलेले आहेत .तर टिळकांच्या केसरी ने शाहू महाराज मागासलेल्या वर्गीयांच्या हिताच्या बुरख्याखाली केवळ मराठा समाजाचे हित साधू इच्छितात अशी प्रखर टिका केली.

शाहू महाराज आपल्या कृतीतून विरोधकांचे नामोहरन करत असत.आरक्षणाला विरोध झाल्यानंतर त्यांनी अभ्यंकर वकीलांना घोडयाच्या थट्टीकडे नेले व तेथे नोकरांना सांगितले घोडयांना चारा चंदी आणावयास सांगितले.आणि सर्व चंदी (हरभरे व चारा एका जाजमावर टाकले. त्याचबरोबर सर्व घोडी धावून आली, दांडगी, सशक्त, तल्लख होती ती पुढे झाली व सर्व हरभरे त्यांनी फस्त केली. लंगडी, अशक्त, रोगी मागेच राहिली. त्यांना पुढे येता येईना, त्यामुळे त्यांना चारा चंदी मिळाला नाही. हे दृश्य अभ्यंकरांना दाखवून राजे म्हणाले हे पाहिलेत अभ्यंकर जी हुशार, सशक्त घोडी होती त्यांनी चारा चंदी फस्त केली आणि ज्यांना खरोखरच आवश्यकता होती ती घोडी मागे राहिली म्हणून त्यांना तोब यातून चारावे लागते.तसे चारले नाही, तर त्यांना काहीच मिळणार नाही, मग आता तुम्ही सांगा मागे पडलेल्या समाजाला पुढे आणण्याकरीता जादा सवलती नकोत का द्यायवयास अभ्यंकर क्षणभर चिरमग्न झाले आणि म्हणाले महाराज, तुमचे बरोबर आहे या विचार कृतीतून बोध घेण्याची सामाजिक बांधिलकी विचारात घेण्याची आवश्यकता होती.

**तक्ता क्र.1 कोल्हापूरातील जातीनिहाय नोक यांचे प्रमाण (1894**

| सर्वसाधारण खाते नोक या | ब्राम्हण | ब्राम्हणोत्तर | अस्पृश |
|---|---|---|---|
| सरकारी खाते | 60 | 11 | |
| खाजगी खाते | 46 | 07 | |

लोकसंख्येचा विचार करता ब्राम्हण व इतर उच्चवर्णीयांची लोकसंख्या 26000 इतकी होती, तर राज्याची संपूर्ण लोकसंख्या 9 लाख इतकी होती. याचा अर्थ कोल्हापूर संस्थानात 3 टक्के उच्चवर्णीय पुढारलेल्या जातीच्या लोकासाठी 50 टक्के सरकारी नोक या तर उरलेल्या 97 टक्के बहुजन समाजासाठी 50 टक्के सरकारी नोक यात आरक्षण ठेवल्याने फारसे बिघडणार नव्हते.पण ब्राम्हण वर्गाचे खरे दुःखणे असे होते की, त्यांची मक्तेदारी नष्ट होणार होती, त्याच बरोबर राजकीय स्वातंञ्याची मागणी करणारे ब्राम्हण इंग्रजापासून दुरावला जाईल व इंग्रज बहुजन समाजाला जवळ करेल, त्यामुळे ब्राम्हणवर्ग शाहूंच्या राखीव जागेच्या धोरणाला विरोध करित होते.या सर्व विरोधाला शाहु राजांनी संयमाने व निर्धारपणे तोंड दिले.शाहू छत्रपतींचा वेदोक्त प्रकरणात सनातनी ब्म्हवृदांने भयानक अपमान केला होता, त्या अपमानाने त्यांना खरी जाग आली होती.ते म्हणत माझ्यासारखा राजाला एवढा त्रास, तर माझा बहुजन समाजाला किती सोसावा लागत असेल याची त्यांना कल्पना आली होती. शाहुंच्या मते, मागासलेल्या जातीतील उच्चशिक्षण घेतलेल्या व्यक्तिंना सरकारी नोक यांच्या रूपाने जर त्यांच्य उच्चशिक्षणाची

पारितोषिके विस्तृत रूपाने विभागून दिली नाहीत, तर त्यांच्या जातीत उच्च शिक्षण घेण्याची आकांक्षा आणि उमेदच पैदा होणार नाही. त्यासाठी त्यांच्या शिक्षणाची सोय तर करायला हवीच, पण शिकून तयार झाल्यावर त्यांना सामजिक समतेच्या तत्त्वानुसार योग्य संधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.आतापर्यंतच्या कालावधीत त्याचा लाभ फक्त वरिष्ठ वर्गाने घेतला आहे. या जाहीरनाम्यामुळे सत्तेचा वाटा बहुजन समाजाला देण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले.

आरक्षणाच्या धोरणामुळे राजर्षींच्या विचारांना चालना मिळाली, व त्यातून सुधारणा घडून आल्या मागास बहुजन समाजामध्ये परिवर्तन झाले. या जाहीरनाम्यामुळे **1922** पर्यत संस्थानातील **79** अधिका यापैकी **20** अधिकारी ब्राम्हण तर **59** अधिकारी ब्राम्हणोत्तर होते.शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या ब्राम्हणाची **2722**, तर ब्राम्हणोत्तर **21,027** इतकी विद्यार्थी संख्येत वाढ झाली. यावरून राजांचे आरक्षणाचे धोरण किती सार्थ व सामाजिक न्यायावर आधारलेले होते. याची प्रचिती येते. त्याचबरोबर महाराजांच्या कार्य देशातील ब याच ठिकाणी पोहच त्यामुळे आरक्षण चळवळींना मोठया प्रमाणात चालना मिळाली, म्हैसुर राज्यामध्ये इ.स.**1918** मध्ये याच प्रमाणे राखीव जागा ठेवण्यात आल्या पुढे **1918** मध्ये साऊथब्युरो कमिटीपुढे शाहू महाराजांनी मराठयासाठी वेगळया आरक्षणाची मागणी करतात.शाहू महाराजांच्या दुरदृष्टीची जाणीव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना असल्यामुळे मराठा समाजासाठी स्वतंत्र प्रतिनिधीत्व देण्यात यावे अशी लिखित मागणी साऊथब्युटो कमिटीला देतात.

पुढे **1921** मध्ये मद्रासमध्ये जस्टिस पार्टी च्या सरकारने आणि **1925** मुंबई प्रांताच्या सरकारने राखीव जागेचे धोरण अवलंबिले आहे.

राजर्षी शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची प्रेरणा महात्मा फुले यांचे विचार होते. त्यामुळे राजर्षी शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्नेहसंबध अधिक घट्ट होते. यावद्दल डॉ.आंबेडकरांचे चरित्रकार चांगदेव भगवनराव खैरमोडे म्हणतात त्यांचा (राजर्षी शाहू भीमरावांशी परिचय झाला व तो त्यांनी स्वतःहून वृध्दिंगत केला, ते मुंबईत जेव्हा जेव्हा येत तेव्हा तेव्हा ते भीमरावांची भेट घेण्यासाठी पोय बावडीला चाळीखाली मोटार उभी करून त्यांना खालून हाक मारीत असत. ते त्यांना मुंबईतील निवासस्थानी घेऊन जात व आपल्या उजव्या बाजुला बसवून त्यांच्यासह भोजन करीत, त्यांची कन्या आक्कासाहेब महाराज व पुत्र राजाराम महाराज ही भीमरावांना मामा म्हणून संबोधित. भीमरावांचे संवध महाराजांच्या कुटूंबियांशी फार जिव्हाळयाचे होते. महाराज व भीमराव यांची ब्राम्हणोत्तर समाजाच्या सर्वांगीण प्रगती कशी करावी याबद्दल चर्चा होई व ते अनेक योजना आखून ठेवीत यावरून या महापुरूषांना समाजामध्ये सामाजिक न्याय निर्माण करून बहुजन समाजाच्या सर्वांगीण विकासाचे धोरण राबविणे हा मुख्य हेतू होता. या पुढे जावुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वतंत्र भारताच्या संविधानात बहुजन समाजाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकास घडवुन आणण्याच्या दृष्टिने कलम **340, 341** व **342** या कलमाद्वारे आरक्षणाची घटनात्मक तरतुद करतात, त्याचवरोबर राज्यघटनेत कलम **45** अन्वये सर्वांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत मिळावयाला पाहिजे अशी तरतूद केली आहे. यावावत डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात जोपर्यत सामाजिक, आर्थिक, व राजकिय क्षेत्रात विषमता असेल तो पर्यत आरक्षणाचे धोरण राबवावेच लागेल, याचा अर्थ आरक्षण भीक, दया, माया नसून तो घटनात्मक अधिकार आहे.हे त्यांनी जगाला पटवून दिले , यावरून डॉ.आंबेडकरांना महाराजासंबंधी कसा आदर होता.राजर्षींचे व्यक्तिमत्व प्रेरणादायी कसे होते, हे लक्षात येते.

मनुष्य निसर्गदत्त तो स्वतंत्र असतो हा मूलभूत विचार सामाजिक न्याय या संकेल्पनेशी आहे.मात्र या देशामध्ये जाती वर्णव्यवस्थमुळे उच्चभ्रु जातीने मागास जातींना मानवी अधिकारापासून वंचित ठेवले, त्यांच्यावर अन्याय, अत्याचार केलेत.त्या वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणून सामाजिक न्याय प्रस्तापित करणे हा हेतू राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या आरक्षणाच्या धोरणमागे होता.

आज प्रस्तुत काळात सुध्दा समाजात जातींच्या आधारे मागास जातींचे शोषण होतांना बघतो, वाचतो, सामाजिक, आर्थिक न्यायावावत विसंगती आहे. भारतीय समाजातील जातींवर आधारित असलेली विषमता संपवून समाजात समता प्रस्थापित करण्याचे साधन म्हणून घटकारांनी आरक्षणाची तरतूद संविधानात केलेली आहे.पण आजही देशामध्ये आरक्षणाची, आरक्षणतत्वाची, आरक्षणाच्या आवश्यकतेची, आरक्षण धोरणाच्या वास्तविकतेची व आरक्षणाच्या काटेकोर अंमलवजावणीची

बाजू कोणीच व्यवस्थितपणे समजावून घेत नाही. आरक्षण घेणारे आपल्याच सामाजिक व्यवस्थेमुळे मागे राहिले आहेत या भावनेतून उच्च वर्गीयांनी पुढे येण्याची गरज आहे. त्याचबरोबर सामाजिक न्यायाची भूमिका पुढे नेणा या जागृत समाजाची व सामाजिक लोकशाही नेतृत्वाची राष्ट्राला आवश्यकता आहे.

**संदर्भसुची ः**

1. राजर्षी शाहू विचार व कार्य संपादक प्राचार्य. डॉ. जे. के. पवार
2. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे क्रीडाक्षेत्रातील योगदान श्री. पी. एस. खाडे
3. शाहू महाराज जयसिंगराव पवार